**ग्रीनलॉन्स विदयालय**

**दिनांक - २१-०२-२०२५** **FINAL EXAMINATION (2025)** **वेळ - २तास**

**इयत्ता - ६वी - अ,ब,क** **मराठी** **मार्क - ८०**

**INSTRUCTIONS:-** **1.This paper comprises of two sections.Section A and B.**

**2. Section A answers must be written on the answer sheet.**

**3. Section B answers must be written on the paper itself. And Attach paper with section A answer sheet.**

**विभाग - "अ"** **[४० मार्क]**

प्रश्न १. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा. [५]

१. अवघे -------------------- वर्षांचे असताना डॉ. गोवारीकरांनी पत्र लिहिले.

( चौदा, तेरा, पंधरा )

२. डॉ. वसंत गोवारीकरांनी -------------------------------- अंदाजाची नवीन पद्धत शोधून काढली.

( हिवाळ्याच्या, पावसाच्या, उन्हाळाच्या )

३. शाळेत असताना त्यांना नवनव्या ---------------------- सुचायच्या.

( कल्पना, शक्कल, योजना )

४. भारताच्या ------------------------ क्षेत्रात त्यांनी केलेली कामगिरी फार मोठी आहे.

( मनोविज्ञान, भौतिक , विज्ञान )

५. मी कामात पुरता ------------------------------- होतो.

( मग्न , अडकलो , गुरफटलो )

प्रश्न २.अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही ५) (ANY 5)** [५]

१. उच्च शिक्षणासाठी डॉ. वसंत गोवारीकर कोठे गेले?

२. कवीने काय तोडण्यास मनाई केली आहे?

३. चंद्रावरच्या शाळेत जाताना कशाचे ओझे नसेल?

४. होळीला करायचा गोड पदार्थ कोणता?

५. कवीच्या मताप्रमाणे होळी साजरी केल्यास त्याच्या घरी कोण पाणी भरेल?

६.चंद्रावरची शाळा या कवितेच्या कवयित्री कोण आहेत?

प्रश्न २.ब) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही ३)** [६]

१. वैष्णवीच्या अंगी असलेल्या कला कोणत्या आहेत?

२. भारतीय संशोधकांची चार नावे लिहा?

३. कवीने होळीच्या दिवशी कोणती शपथ घ्यायला सांगितली आहे?

४.चंद्रावरच्या शाळेत चांदण्यांशीच का खेळावे लागणार आहे?

प्रश्न २.क) खालील विधाने पूर्ण करून वाक्य पुन्हा लिहा. **(Rewrite the sentence)** [२]

१. कला आपले जीवन सुंदर करतात आणि ..........................................

अ) आपलं व्यक्तिमत्त्वही फुलवतात.

ब) आपले जीवन फुलवतात.

क) आपले व्यक्तिमत्त्वही प्रसन्न करतात.

२. पाऊस केव्हा पडेल? किती पडेल? याची .........................................

अ) जगभर चिंता असते.

ब) देशभर चिंता असते.

क) सगळ्यांना चिंता असते.

प्रश्न ३. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

वैष्णवी, गणिताचा पेपर कठीण गेला, म्हणून गणितानंतर असलेल्या विषयांचे पेपर अवघडच जाणार असे होत नाही ना! मग त्याच त्या गोष्टीचा विचार करत बसल्याने उरलेल्या पेपरवरही त्याचा विपरीत परिणाम होतो. अगं, एखाद्या विषयात गुण कमी पडले, तर याचा अर्थ आपण आयुष्यात अपयशी झालो असे नाही. तुला सांगतो, गणिताशी तू मैत्री कर. गणितातील संकल्पना, संबोध, क्रिया तू नीट समजावून घे. उदाहरणे सोडवण्याचा चांगला सराव कर हा विषय लवकरच तुझा लाडका होईल, हे अगदी नक्की.

बाळा, आणखीन एक तुला सांगतो. परीक्षेतील गुण किंवा श्रेणी महत्त्वाची आहेच; पण त्याहीपेक्षा आपल्या आंतरिक गुणांची वाढ करणे हे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येकाने एखादी तरी कला जोपासली पाहिजे. स्वतःमधील गुणांची वाढ करायला तुला अनेक संधी मिळतील.

दिवाळीच्या सुट्टीत मी गावी येणार आहे. मग आपण खूप खूप मजा करू, किल्ले बांधू, कंदील तयार करू, गप्पा मारू आणि दिवाळीचा फराळही खाऊ. खाऊवरून एक गोष्ट आठवली मला. या दिवाळीत गावी येताना तुझ्या आवडीचा खाऊ घेऊन येणार आहे. कुठला ते तू ओळखलं असशीलच. तुझा पुस्तकांचा खाऊ! गावी येताना मी तुझ्यासाठी गोष्टींची अनेक पुस्तके घेऊन येणार आहे. वाचून बघ तू. खूप आवडतील तुला. बरं, आता थांबतो. बाकी सारे भेटीअंती बोलू.

प्रश्न :-

**कृती १**. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [३]

१. वैष्णवीला बाबा दिवाळीच्या सुट्टीत गावी येताना कोणता खाऊ घेऊन येणार आहे?

२. वैष्णवीला कठीण गेलेला पेपर कोणता आहे?

३. परीक्षेतील गुणांपेक्षा महत्त्वाचे गुण कोणते आहेत?

**कृती २**. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. गणित विषय वैष्णवीचा लाडका होण्यासाठी बाबांनी तिला कोणते उपाय सुचवले?

**कृती ३**. रिकाम्या जागा भरा. [१]

१. ------------------------ सुट्टीत मी गावी येणार आहे.

२. स्वतःमधील गुणांची वाढ करायला तुला अनेक ------------------------ मिळतील.

**कृती ४**. कोण - कोणास म्हणाले ते लिहा. [१]

१. "बाकी सारे भेटीअंती बोलू."

**कृती ५**. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. [१]

( कठीण , लक्ष , लक्ष्य , सरळ )

१. सोपे X ------------------------ २. दुर्लक्ष X ------------------------

प्रश्न ४. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा. [६]

१. माझा आवडता सण

**मुददे** - सणाचे नाव - कोणत्या महिन्यात येतो - कोणती तयारी करता - सणाचे महत्त्व.

२. माझा दादा

**मुददे** - दादाचे वर्णन - त्याचा स्वभाव - तुम्हाला कशी मदत करतो -

३. माझा आवडता नेता

**मुददे** - नेत्याचे नाव - नेत्याचे वर्णन - त्यांचा स्वभाव - त्यांनी केलेले कार्य -

४. माझे गाव

**मुददे** - गावाचे नाव - गावाचे वर्णन - गावातील लोक - गावचे वैशिष्टय.

प्रश्न ५. खालील उतारावाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा

देवाने बनवलेल्या सर्वात सुंदर गोष्टींपैकी एक फुले आहेत. फुले अनेक रंगांमध्ये येतात. रंगीबेरंगी फुलांचे ताटवे पाहिले,की मन प्रसन्न होऊन जाते. आपल्या सभोवती उमललेल्या फुलांच्या सुवासाने आजूबाजूचे वातावरण सुगंधित होते. त्या नाजूक, टवटवीत, गंधमिश्रित फुलांच्या दर्शनाने नयनसुख मिळते. आज उमललेले फूल उदया कोमेजून जाणार असते; पण त्याच्या या क्षणभंगुर जीवनासाठी फुलाला कधी रडताना पाहिले आहे का तुम्ही? दुसऱ्याला प्रफुल्लित करत, सुवास देत ते हसत-बागडत राहते. फुले मुलांना सांगतात की, आजचा दिवस आपला आहे. या दिवशी आनंदाने हसा, खेळा, बागडा. दुसऱ्यांना आनंद, सुख-समाधान देण्यातच खरा आनंद दडला आहे." असा संदेश फुले मुलांना देतात.

बहुतेक फुलांना गोड वास असतो. फुलांचा उपयोग नैसर्गिक रंग तयार करण्यासाठी, अत्तर बनवण्यासाठी,तेल बनवण्यासाठी तसेच औषधे बनवण्यासाठी होतो. स्त्रिया फुलांचा उपयोग केसात माळण्यासाठी करतात. फुलांना नेहमी समर्पण, सौंदर्य आणि कलेचे प्रतीक मानले आहे.

प्रश्नः-

कृती १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [३]

१. नयनसुख कोणाच्या दर्शनाने मिळते?
२. मन कशाने प्रसन्न होते?
३. फुलांच्या सुवासाने वातावरण कसे होते?

कृती २. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. फुले मुलांना कोणता संदेश देतात?

कृती ३. रिकाम्या जागा भरा. [१]

१. आज उमललेले फूल उदया ------------------------------ जाणार असते.

२. फुलांना नेहमी समर्पण, सौंदर्य आणि ---------------------------- प्रतीक मानले आहे.

कृती ४. खालील इंग्रजी शब्दांचे मराठीत अर्थ लिहा. [२]

( सुंदर , नाजूक , प्रसन्न, आनंद , सुवास )

१. Fragrance - ------------------------------- २. Happiness - --------------------------------

३. Beautiful - --------------------------------- ४. Delicate - -------------------------------------

**INSTRUCTIONS- Section B answers must be written on the paper itself. And attach paper with Section A answer sheet.**

| **नाव -** ---------------------------------------------------- | **हजेरी क्र.** .................**इयत्ता - ६- अ,ब,क** |
|---|---|

**विभाग - " ब "** **[४० मार्क]**

प्रश्न १ अ) खालील वाक्यांतील नामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [४]

१. भारताची राजधानी मुंबई आहे.

उत्तर - नाम - ------------------------------ नामाचा प्रकार - ---------------------------------------

२. आंबा फळांचा राजा आहे.

उत्तर - नाम - ------------------------------ नामाचा प्रकार - ---------------------------------------

३. राम खूप हुशार मुलगा आहे.

उत्तर - नाम - ------------------------------ नामाचा प्रकार - ---------------------------------------

४. आजीने मला गुळ खायला दिला.

उत्तर - नाम - ------------------------------ नामाचा प्रकार - --------------------------------------

प्रश्न १ ब) खालील वाक्यांतील सर्वनाम ओळखा. [४]

१. ते झाड खूप मोठे आहे. सर्वनाम - ------------------------------------------------

२. आम्ही मैदानावर खेळतो. सर्वनाम - ------------------------------------------------

३. रस्त्यात कोणी आढळेना. सर्वनाम - -----------------------------------------------

४. तिचा चेहरा प्रसन्न दिसत होता. सर्वनाम - ------------------------------------------------

प्रश्न १ क) खालील वाक्यांतील विशेषण ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [४]

१. ती पतंग लाल रंगाची आहे.

उत्तर - विशेषण - -------------------------- विशेषणाचा प्रकार - -----------------------------------

२. मी खोल समुद्रात राहतो.

उत्तर - विशेषण - -------------------------- विशेषणाचा प्रकार - -------------------------------

३. रुग्णाजवळ एकच व्यक्ती थांबेल.

उत्तर - विशेषण - ---------------------------- विशेषणाचा प्रकार - ----------------------------------

४. त्याने तीन मूर्ती मागवल्या.

उत्तर - विशेषण -----------------------------  विशेषणाचा प्रकार - ----------------------------------

प्रश्न २ अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. [३]

| दीप, कर , मिठी , प्रेरणा , विदयार्थी, पाय, मीठी, युद्ध |
|---|

१. आलिंगन - -------------------------------- २. दिवा - ---------------------------------------

३. शिष्य - ------------------------------------- ४. हात - ----------------------------------------

५. स्फूर्ती - ------------------------------------ ६. चरण - ---------------------------------------

प्रश्न २ ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. [३]

| सुलटे, स्वामी , बित्रा , जीवन , बीजारोपण , भित्रा, दोष , पुलटे |
|---|

१. उलटे X --------------------------------- २. निर्मूलन X -----------------------------------

३. सेवक X -------------------------------- ४. पराक्रमी X ---------------------------------

५. गुण X ----------------------------------- ६. मृत्यू X ---------------------------------------

प्रश्न २ क) खालील शब्दांचे वचन बदला. [३]

१. घोंगडी - ------------------------------- २. भाजी - ---------------------------------------

३. चरण - --------------------------------- ४. देखावा - -------------------------------------

५. बाहुली - ------------------------------ ६. घाणा - ----------------------------------------

प्रश्न २ ड) खालील शब्दांचे लिंग बदला. [३]

१. मित्र - ---------------------------------- २. परका - --------------------------------------

३. दादा - --------------------------------- ४. काका - -------------------------------------

५. सोबती - ----------------------------- ६. पुढारी - -------------------------------------

प्रश्न ३ अ) खालील शब्दांचे अर्थ लिहा. [४]

| ध्येय , कठीण, अयशस्वी, पद्धती, चालीरीती ,टेलिफोन, पावसाळा, पूर्णपणे |
|---|

१. संकल्प - ------------------------------------ २. दूरध्वनी - ------------------------------------

३. अवघड - ------------------------------------ ४. अपयशी - ------------------------------------

५. मान्सून - ------------------------------------ ६. पुरता - ------------------------------------

७. रूढी - ------------------------------------ ८. प्रथा - ------------------------------------

प्रश्न ३ ब) खालील शब्दांपासून वाक्य तयार करा.**(make sentences using these words)** [४]

१. श्रेणी (Grade) - ------------------------------------------------------------------------------------------------

२. आण (Oath) - ------------------------------------------------------------------------------------------------

३. सराव (Practice) - ------------------------------------------------------------------------------------------------

४. भारी (Great) - ------------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न ३ क) खालील शब्दांतून अचूक शब्द निवडून लिहा. [५]

१. संकल्पना, सक्कलपणा,संकल्पाना, सक्काळपणा - ------------------------------------------------

२. प्रकाल्प,प्रकल्प, प्रक्ल्प,प्रकलप - ------------------------------------------------

३. व्यक्तिमत्त्व, व्यक्तीमत्व, व्यक्तिमत्व, व्यक्तिमत्वव - ------------------------------------------------

४. अनिष्ठ,अनिष्ट, अनीष्ठ, अनिस्ट - ------------------------------------------------

५. ओक्सिजन,ऑकिसीजन,ऑक्सिजन, औक्सीजन - ------------------------------------------------

प्रश्न ४ खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा. [३]

| चंद्रावरती, मुले, एकविसाव्या, खडू, भरेल, चंद्रावरच्या, फळा, चांद्रवरती |
|---|

१. ---------------------- शतकात -------------------------

------------------------------ शाळा,

----------------------------- शाळेत नसेल

---------------------- आणि --------------------.

------------------------------------------------------------------------------------------------